राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेसाठी सन २०१८-१९ करिता अनुदान वितरणाबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांकः सानुग्रह२०१८/प्र.क्र.४४/१८/एसडी-६
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२
तारीख: १७ मे २०१८

वाचा -

१) विभागाचा शासन निर्णय क्रमांकः पीआयई२०११/प्र.क्र.२४९/प्राशि-१,दि. ११.७.२०११
२) विभागाचा शासन निर्णय क्रमांकः पीआयई२०११/प्र.क्र.२४९/प्राशि-१, दि. १.१०.२०१३
३)वित्त विभागाचे परिपत्रक क्र. अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २.४.२०१८

प्रस्तावना -

विभागाच्या शासन निर्णय क्र.पीआरई-२०११/प्र.क्र.२४९/प्राशि-१, दि.१.१०.२०१३ अन्वये इयत्ता १ली ते १२वी पर्यंत शिकणा-या मुला/मुलींना अपघातामुळे क्षतीची नुकसान भरपाई इत्यादी देण्याबाबत राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना सन २०१२-१३ पासून नियमित स्वरूपात राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत २०१८-१९ मधील राज्यातील एकूण प्रलंबित लाभार्थ्यांची संख्या ४८४ इतकी असून, या प्रलंबित लाभार्थ्यांसाठी तसेच वर्षभरात प्राप्त होणाऱ्या दाव्यांची प्रतिपूर्ती करण्यासाठी रक्कम रू.७,६९,६५,०००/-(अक्षरी रुपये-सात कोटी एकोणसत्तर लाख पासष्ट हजार फक्त)इतकी रक्कम वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षात राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेसाठी अर्थसंकल्पीत करण्यात आलेल्या निधीमधून एकूण रू.७,६९,६५,०००/- (अक्षरी रुपये- सात कोटी एकोणसत्तर लाख पासष्ट हजार फक्त) इतका निधी वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेसाठी वितरीत करण्यात येणारा एकूण रू. ७,६९,६५,०००/- (अक्षरी रुपये- सात कोटी एकोणसत्तर लाख पासष्ट हजार फक्त) इतका निधी मागणी क्र.ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण ८० सर्वसाधारण - ८०० इतर खर्च, (०६)(०२), राज्यातील विद्यार्थ्यांसाठी राजीव गांधी विद्यार्थी अपघात योजना (२२०२ ३१०९) ३१, सहाय्यक अनुदाने (वेतनेतर) या लेखाशिर्षांतर्गत उपलब्ध तरतूदीमधून वितरित करण्यात यावा. वरील खर्च वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.२.४.२०१८ च्या परिपत्रकातील सूचनांनुसार करण्यात यावा. यासाठी आयुक्त (शिक्षण), पुणे यांना नियंत्रक अधिकारी, तसेच शिक्षण निरीक्षक(उत्तर/दक्षिण/पश्चिम), मुंबई व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद यांना आंहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भाधिन दि.२.४.२०१८ च्या परिपत्रकास अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे. सदर परिपत्रकाच्या परिशिष्टातील अनुक्रमांक ८ मध्ये नमूद अटींची तसेच त्या परिपत्रकातील अटींची पूर्तता करण्याची दक्षता मा. आयुक्त (शिक्षण), पुणे यांनी घ्यावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५१७१५४४००९७२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Suryakant B. Patil

Digitally signed by Suryakant B. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1e4d61e2654004fd87056f70e5ae32fb1d620137 50a34b063c53c71f673388b9, cn=Suryakant B. Patil
Date: 2018.05.17 15:43:51 +05'30'

(सुर्यकांत पाटील)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव.
३. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद /विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा. सर्व विधानसभा /परिषद सदस्य, विधानभवन मुंबई.
५. प्रधान सचिव / सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र १ / २ , मुंबई / नागपूर
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १ / २ , मुंबई / नागपूर
८. संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९. सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
१०.मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मुंबई
११.आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१२.राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१३. शिक्षण संचालक (माध्य. व उच्च माध्य.), शिक्षण संचालनालय, पुणे .
१४.शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
१५.संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
१६. शिक्षण संचालक, अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण संचालनालय, पुणे
१७.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
१८. विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
१९. शिक्षणाधिकारी (माध्यमिक, प्राथमिक, निरंतर) (सर्व)
२०. शिक्षण निरीक्षक (दक्षिण, पश्चिम, उत्तर) मुंबई.

२१.वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे.
२२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२३. सर्व वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण विभाग)
२४. लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई /पुणे /नागपूर/ औरंगाबाद
२५. वित्त विभाग (व्यय-५) / अर्थसंकल्प शाखा, मंत्रालय, मुंबई.
२६.अर्थसंकल्प कार्यासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२७ .निवड नस्ती (एसडी-६)